
# मराठा सत्तेचा

## विस्तार आणि ऱ्हास

(इ.स. १७६१ ते १८१८)



डॉ. मंदा मोरे-थोरात
डॉ. गौरी पाटील

Prashant



# १ छत्रपती शाहू

## १.१ महाराणी ताराबाई आणि छत्रपती शाहू यांच्यातील संघर्ष.

### १.१.१. महाराणी ताराबाई (इ. स. १७०० ते १७०७)

**महाराणी ताराबाईचे बालपण :**


महाराणी ताराबाई या छत्रपती राजारामाच्या पत्नी होत्या. सेनापती हंबीररावांची कन्या ताराबाई या वडीलाप्रमाणेच कौतुकास पात्र होत्या. वयाच्या आठव्या वर्षापासून त्या सैनिक शिक्षण घेत होत्या. लहानपणापासूनच त्यांचा स्वभाव हा धाडसी होता. त्या शूर, हुषार व चतुर होत्या. त्यांच्यातील हे गुण संभाजीराजे यांनी हेरले. त्यामुळेच त्यांनी हंबीररावांकडे राजारामासाठी ताराबाईंना मागणी घातली. ताराबाईच्या वडीलांनी ती आनंदाने मान्य केली.

### १.१.२ राजारामांना मराठ्यांचा राजा म्हणून घोषित:

लग्नानंतर ताराबाई खूप समजुतदारपणे सासरी वागायच्या. हे पाहून सर्वांना अभिमान वाटायचा. शंभूराजांच्या वध झाल्यानंतर मोगल सत्ता मराठी राज्य गिळंकृत करण्याच्या इराद्यात होती. अशात रायगडावरील मुत्सद्दी येसाजी कंक आणि रायगडचा किल्लेदार चांगोजी काटकर तसेच इतर राजकारणातील मुत्सद्दी व्यक्ती या सर्वांनी विचारविनीमय केला. राजारामाची नजरकैदेतून सुटका

### १.१.६ महाराणी ताराबाईंची योग्यता (कर्तृत्व):

छत्रपती राजारामांच्या मृत्यूनंतर मराठा स्वराज्यास तारून धरण्यास महाराणी ताराबाईंची योग्यता व कर्तृत्व महाकामी आले.



## १.२ बाळाजी विश्वनाथ (१७१३- १७२०) सुसंघटीत करण्यामध्ये भूमिका:

### १.२.१ बाळाजी विश्वनाथाचा उदय:

बहादूरशहाने दिलेल्या अधांतरीत निर्णयामुळे शाहू महाराज पेचात सापडले होते. त्यातच धनाजी जाधवासारखा शूर सेनापती मरण पावल्यामुळे शाहूंची बाजू कमकुवत झालेली होती. शाहूंनी धनाजी नंतर त्याचा मुलगा चंद्रसेन जाधव यास सेनापतीपद दिले होते. परंतु तो आतून ताराबाईच्या पक्षास जावून मिळालेला होता. शाहू व ताराबाई यांचा सरदेशमुखी चाललेला संघर्ष पाहून त्याचा फायदा काही मराठा सरदारांनी घेतला. ते स्वतंत्रपणे वागू लागले होते. चंद्रसेन जाधवाप्रमाणेच दमाजी थोरात, कृष्णराव, खटावकर, उदाजी चव्हाण, रंभाजी निंबाळकर यासारख्या सरदारांनी देखील शाहूविरूध्द बंड पुकारले. अशा बिकट परिस्थितीत शाहूंना वर काढण्याचे, त्यांचा पक्ष बळकट करण्याचे काम बाळाजी विश्वनाथ याने केले.

बाळाजी विश्वनाथ हे भट घराण्यातील असून त्यांचे गांव हे कोकणातील श्रीवर्धन होय. बाळाजी विश्वनाथ हे सुरूवातीला सिद्दीच्या एका मिठागारावर सामान्य लिपीक म्हणून काम पाहत होते. बाळाजी विश्वनाथ व सिद्दी यांचे आपापसात जमत नसल्यामुळे व सिद्दी घराण्यातील उपद्रवाला कंटाळून बाळाजी विश्वनाथ यांनी कोकण सोडले. त्यांनी कोकण सोडून 'देशा' कडे प्रयाण केले व मराठी राज्याच्या सेवेत रूजू झाले. त्यांच्या अंगी असलेल्या अंगभुत गुणांमुळे त्यांनी आपली स्वत:ची प्रगती फारच कमी अवधीत करून घेतली. राजारामाच्या कारकीर्दीत ते पुण्याच्या सुभेदारीवर होते. पुणे आणि औरंगाबाद या भागात त्यांनी प्रामणिकपणे नोकरी केली व चांगलाच नावलौकिक कमावला.

शाहू महाराज कैदेत असतांना त्यांचा आणि बाळाजीचा स्नेह जमून आला. बाळाजी विश्वनाथ शाहू महाराजांच्या कैदेत असतांना देखील परामर्श घेत असत. शाहू औरंगबादशहाच्या कैदेतून सुटल्यानंतर स्वदेशी आल्यानंतर बाळाजी त्यांना जावून मिळाला. शाहू महाराजांच्या मनात धनाजी जाधवांचा मुलगा चंद्रसेन जाधव याच्या निष्ठेबद्दल शंका होती. म्हणून त्यांनी आपल्या विश्वासातील व्यक्ती बाळाजी विश्वनाथ यास सेनाकर्तेपद दिले. बाळाजी विश्वनाथ यांनी मोठ्या निष्ठेने सेनाकर्तेची कामे पार पाडली व शाहूंचा विश्वास संपादन केला. लष्करी फौजांची उभारणी करणे, पैसा गोळा करणे व राज्याच्या विरोधी असलेल्या लोकांचे पारिपत्य करणे ही कामे सेनाकर्ते म्हणून बाळाजी यांनी पार पाडली. शाहू विरूध्द बंड करणाऱ्या लोकांना आपल्या हुशारीने, मुत्सद्देगिरी व शौर्याने तोंड दिले. त्यामुळे शाहू महाराज बाळाजी विश्वनाथवर खूप प्रसन्न झाले होते.



# २ पेशवा बाजीराव (१७२० ते १७३९)

## २.१ दक्षिणेकडील विस्ताराचे धोरण


### २.१.१ बाजीरावाची पेशवा म्हणून नेमणूक :

पेशवा बाळाजी विश्वनाथ यांचा अकस्मात मृत्यू झाला. बाळाजी विश्वनाथ याने मोठ्या हुशारीने सर्व मराठा सरदारांना एकत्रित आणले होते व शाहूचे महाराष्ट्रातील स्थान पक्के केले होते. त्यामुळे शाहू बाळाजीच्या मृत्यूमुळे शाहूंना खूप दुःख झाले. बाळाजीनंतर त्यांचा मुलगा बाजीराव हा देखील तितकाच कर्तबगार आहे याची खात्री शाहू महाराजांना वाटत होती. बाजीरावाने आपल्या वडीलांबरोबर राहून महाराष्ट्राचे आणि दिल्लीचे राजकारण अगदी जवळून पाहीले होते. शाहूना माणसाची उत्तर पारख असल्यामुळे त्यांनी बाजीरावामधील गुण ओळखले व त्यास पेशवेपदाची वस्त्रे देण्याचे ठरविले.


शाहूच्या या निर्णयास अनेक मराठा सरदारांनी विरोध केला. बाळाजी विश्वनाथच्या मृत्यूनंतर बाजीराव अवघा १९ वर्षांचा होता. शाहूच्या दरबारातील इतर सरदारांना बाजीराव हा कमी वयाचा होता. तसेच तो उतावळ्या स्वभावाचा व अकारण संकटे ओढावून घेणारा आहे असे वाटत होते. म्हणूनच श्रीपतराव प्रतिनिधी, आनंद सुमंत, नारोराम मंत्री, खंडेराव दाभाडे, कान्होजी भोसले यासारख्या प्रमुख

## २.३ बाजीराव पहिला याची कामगिरीः

बाजीराव हा वयाच्या अवघ्या १९ वर्षी पेशवा झाला. शाहूनी बाजीरावाच्या ठिकाणी असलेले गुण लक्षात घेतले. इतर मराठा सरदारांचा विरोध पत्करून त्यांना पेशवेपद दिले. शाहूनी दिलेल्या पेशवेपदाची धुरा बाजीरावाने देखील तितक्याच तळमळीने निभावली. बाजीराव पहिला याची कामगिरी आपल्याला पुढील काही मुद्दयाच्या आधारे सांगता येईल.




१) **सर्व बंडखोर सरदारांवर वचक बसविला:** बाजीराव ज्यावेळेस सत्तेवर आला त्यावेळी सर्व मराठेशाहीतील सरदारांमध्ये एकता नव्हती. स्वार्थी वृत्ती बळावलेली होती. शिवाजी महाराजांनी निर्माण केलेली सैन्यातील शिस्त ही देखील नाहीशी झालेली होती. मराठी शाहीतील सरदार, जहागीरदार हे



# ३ बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब पेशवे (१७४०-६१)

## ३.१ बाळाजी बाजीराव

### ३.१.१ बाळाजी बाजीराव यांची पेशवेपदावर नेमणूक :

बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब यांचा जन्म १२ डिसेंबर १७२१ रोजी झाला. नानासाहेब १७३६ म्हणजेच वयाच्या १५ व्या वर्षांपासूनच मोहिमेवर जावू लागला होता. त्याचे बरेचसे लष्करी शिक्षण हे त्याचा चुलता चिमाजी अप्पा याच्या हाताखाली प्रत्यक्ष लढलेल्या स्वाऱ्यांमध्येच झाले होते. याशिवाय बाळाजीच्या लहानपणापासूनच त्याच्या शिक्षणाची उत्तम काळजी देखील घेण्यात आली होती. वयाच्या सतरा अठरा वर्षांपासूनच नानासाहेब एखाद्या मुरब्बी राजकारणी पुरूषाला शोभतील अशी मुद्देसूद पत्रे लिहू लागला. याचबरोबर पेशव्याचा प्रतिनिधी म्हणून देखील बराच काळ तो साताऱ्याच्या दरबारात शाहूबरोबर राहिलेला होता. त्याने आपल्या वडीलांच्या व चुलत्याच्या धडाकेबाज स्वाऱ्यांबद्दल खूप माहिती मिळवलेली होती. तसेच कित्येक स्वाऱ्यांमध्ये तो सहभागी देखील झालेला होता. आपल्या वडीलांबरोबर व काकासोबत राहून त्याने शाहू व त्याच्या सभोवतालची माणसे, राजकारणात होणारी कपट कारस्थाने इत्यादीची त्याला पूर्ण जाणीव होती.



# ४ पानिपतची तिसरी लढाई (१७६१)

### ४.१ पानिपतच्या तिसऱ्या लढाईची पार्श्वभूमी :

आजपर्यंत भारताच्या इतिहासात अनेक लढाईंची नोंद झालेली असली तरी पानिपत रणक्षेत्रावर लढल्या गेलेल्या लढाईंना विशेष महत्व आहे. अगदी महाभारतात सुध्दा कौरव व पांडव यांच्यातील प्रसिध्द युद्ध ज्या कुरूक्षेत्रावर लढले गेले, ते कुरूक्षेत्र म्हणजे हेच पानिपत येथील रणक्षेत्र आहे. आजपर्यंत मध्ययुगाचा विचार करता पानिपतच्या तीन लढाया विशेष गाजल्या आहेत. पानिपतचे पहिले युध्द १५२६ मध्ये झहिरूद्दीन मोहंमद बाबर आणि इब्राहीम खान लोदी यांच्यात झाले. पानिपतचे दुसरे युद्ध १५५६ मध्ये मोगल सम्राट अकबर आणि आदिलशहा सूरचा सेनापती हिमू यांच्यामध्ये झाले.


पानिपतचे तिसरे युध्द १४ जानेवारी १७६१ मध्ये मराठे आणि अफगाणिस्तानचा राजा अहमदशहा अब्दाली यांच्यामध्ये झाले.

बाळाजी बाजीराव यांनी उत्तरेकडे आक्रमक धोरण स्विकारले होते. या धोरणामुळे शिंदे, होळकर, पवार यासारखी मराठा सरदार मंडळी आपले वर्चस्व माळवा, बुंदेलखंड या प्रदेशावर राखून होते. परंतु उत्तरेकडील रजपूत सत्ता मराठयांच्या धोरणाशी जुळवून घेत नव्हत्या. सन १७५२ मध्ये मराठे आणि मुघल

सूड घेण्यासाठी नानासाहेबांनी चिमाजी अप्पांचा मुलगा सदाशिवराव भाऊ यास लष्करासह उत्तरेत पाठविले. यातूनच तिसरे पानिपतचे युद्ध घडून आले.

## ४.२. पानिपतच्या तिसऱ्या लढाईची कारणे:

पानिपतच्या लढाईमुळे भारतीय राजकारणाला एक मोठी कलाटणी मिळाली. त्यामुळे ही लढाई महत्वाची आहे. या लढाईची कारणे पुढीलप्रमाणे आहेत.




१) **संपूर्ण भारतभर मराठी सत्तेचा विस्तार व्हावा ही शिवाजी महाराजांची असलेली सुप्त इच्छा:** छत्रपती शिवाजी महाराजांनी अत्यंत प्रतिकुल परिस्थितीत हिंदवी स्वराज्याचे रोपटे महाराष्ट्रात लावले होते. या रोपटयाच्या विस्तार व्हावा, त्याचे वटवृक्षात रूपात रूपांतर व्हावे आणि संपूर्ण भारतभर मराठी सत्तेची पाळेमुळे पसरावती अशी शिवाजी महाराजांची सुप्त इच्छा होती. बाळाजी विश्वनाथ यांनी दिल्लीला जाऊन मराठयांच्या पराक्रमाचे दर्शन घडविले. त्यांचा पराक्रम पाहून पहिला पेशवा बाजीराव यांनी मराठयांच्या पराक्रमांना उत्तेजन दिले. त्यामुळे संपूर्ण उत्तर भारतात मराठयांच्या सामर्थ्यांचे, पराक्रमाचे आगळे वेगळे दर्शन घडले.

मराठ्यांचे वाढत चाललेले वर्चस्व नजीबखान रोहिल्याला आवडले नाही.

## ४.४ पानिपतच्या लढाईचे परिणाम:

भारताच्या इतिहासात पानिपतचे तिसरे युध्द हे दुरगामी परिणाम करणारे ठरले. या युद्धाचा आणि त्याच्या परिणामाचा विचार अनेक इतिहासकारांनी केलेला आढळतो. इतिहासकारांनी आपले वेगवेगळे दृष्टीकोन जरी मांडले असते तरी लढाईतून झालेले सर्व परिणाम आपल्याला नाकारता येणार नाही. हे परिणाम पुढीलप्रमाणे सांगता येतील.




१) **नाना साहेबांचा मृत्यू :** पानिपतच्या युध्दानंतर मराठयांचे मनोधैर्य खचले. युध्दात पराभव झाल्यामुळे लहानमोठे वाचलेले मराठा सरदार दक्षिणेकडे परतले होते. यातच पानिपतच्या युध्दास मदत कण्यासाठी नानासाहेब पेशवा युद्ध चालू असतांना उत्तरेत झांशीच्या अलीकडेच पाछोरापर्यंत येवून पोहचला होता. परंतु पानिपतच्या युध्दाची बातमी त्याने ऐकली. युध्दात झालेले मराठयांचे खच्चीकरण, झालेला भीषण नरसंहार त्याने ऐकला व ते देखील दक्षिणेस परत आले. पानिपतच्या युध्दात झालेला पराभव व त्यात झालेले प्रचंड नुकसान यातून ते स्वत:ला सावरू शकले नाहीत. पानिपतच्या युद्धानंतर तब्बल पाच महिने नऊ दिवसांनी म्हणजेच २३ जून १७६१ रोजी पुण्याच्या पर्वतीवर नानासाहेबांचा मृत्यू झाला.